# महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१) (ब) प्रमाणे अधिसूचना

ज्या अर्थी माझ्या असे निदर्शनास आले आहे की, पुसेगांव पोलीस ठाणे हददीत मौजे पुसेगांव ता.खटाव येथे श्री सेवागिरी महाराजांची वार्षिक यात्रा **दि. १७/१२/२०२२ ते दि.२७/१२/२०२२** या कालावधीत भरणार आहे. सदर यात्रेचा मुख्य दिवस **दि. २२/१२/२०२२ हा** असुन सदर दिवशी श्री सेवागिरी महाराज यांच्या रथ मिरवणुकीचा कार्यक्रम होणार आहे. सदर यात्रेकरीता महाराष्ट्रातून तसेच शेजारील राज्यातून आठ ते नऊ लाख भाविक लोक येत असतात. त्यामुळे पुसेगांव येथे वाहनांची गर्दी होवुन वाहतुक व्यवस्थेत अडथळा निर्माण होणार आहे.

त्या अर्थी, मी समीर शेख, पोलीस अधीक्षक सातारा, मला प्राप्त झालेल्या महाराष्ट्र पोलीस अधिनियम कलम ३३ (१) (ब) प्रमाणे अधिकारास अनुसरुन पुसेगांव गावातील व परिसरातील रस्त्यावरील वाहतूकीत **दि. १७/१२/२०२२ ते दि. २७/१२/२०२२** या कालावधीकरीता खालील प्रमाणे बदल जारी करीत आहे. याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

## प्रवेश बंद व नो पार्कींग खालीलप्रमाणे (दिनांक १७/१२/२०२२ ते दिनांक २७/१२/२०२२ कालावधीकरीता)

१) वडूज रोडवरील बंद राजवर्धन ढाब्याकडून शिवाजी चौकाकडे जाणेकरीता राज्य परिवहन बसेसना वगळून सर्व वाहनांना प्रवेश करणेस बंदी घालणेत आलेली आहे. सदर रोडवर दुतर्फा सर्व वाहनांना नो-पार्कींग झोन लागू करणेत आलेला आहे. तसेच वडूज रोडवरील सेवागिरी विद्यालयाकडे जाणेकरीता सर्व वाहनांना प्रवेश करणेस बंदी घालणेत आलेली आहे.

२) विसापूर फाटयाकडून शिवाजी चौकाकडे जाणेकरीता राज्य परिवहन बसेस वगळून सर्व वाहनांना प्रवेश करणेस बंदी घालणेत आली असून सदर रोडवरील दोन्ही बाजुंनी सर्व वाहनांना नो-पार्किंग झोन करणेत आलेला आहे.

३) शिवराज कार्यालयाकडून शिवाजी चौकाकडे राज्य परिवहन बसेस वगळून येणारे सर्व वाहनांना प्रवेश करणेस बंदी घालणेत आली आहे. तसेच सदर रोडवर दुतर्फा सर्व वाहनांना नो-पार्किंग झोन करणेत आलेला आहे.

४) फलटण रोडकडून प्रस्तावित एस.स्टी.स्टँड पासून शिवाजी चौकाकडे जाणेकरीता राज्य परिवहन बसेस वगळून सर्व वाहनांना प्रवेश करणेस बंदी घालणेत आलेली आहे. तसेच सदर रोडवर रस्त्याच्या दुतर्फा सर्व वाहनांना नो-पार्किंग झोन करणेत आलेला आहे.

५) शिवाजी चौक पुसेगांव येथून दहिवडी बाजुकडे, फलटण बाजुकडे, वडूज बाजुकडे (चौकापासून चारही बाजूस), व सेवागिरी मंदिरापासून दोन्ही बाजूस २०० मीटर अंतरापर्यंत नो पार्कींग झोन करणेत आलेला आहे.

## दिनांक २१/१२/२०२२ रोजी ००.०० ते दिनांक २५/१२/२०२२ रोजी २४.०० पर्यंत खालीलप्रमाणे वाहतूक व्यवस्थेत तात्पुरता बदल करणेत आलेला आहे.

१) सातारा बाजुकडून दहिवडी बाजूकडे जाणारी वाहने पुसेगांव गावात न जाता नेर, राजापूर/कुळकजाईमार्गे दहिवडीकडे जातील व दहिवडी बाजूकडून येणारी वाहने कटगूण, खटाव, खातगूण, जाखणगांव मार्गे औंध फाटयाकडे विसापूर मार्गे साताराकडे जातील.

२) वडूज बाजुकडून फलटण बाजुकडे जाणारी वाहने पुसेगांव गावात न येता खटाव, जाखणगांव, औंध फाटा, नेर ललगूण मार्गे फलटणला जातील. तसेच फलटण बाजुकडून वडूज बाजुकडे जाणारी वाहने, नेर, ललगूण ,औंध फाटा, जाखणगांव,खटाव मार्गे वडूजकडे जातील.

३) दहिवडी ते डिस्कळ जाणारी व येणारी वाहतूक निढळ, मलवडी, राजापुर मार्गे जातील.

वरील नियमांचे उल्लंघन केल्यास महाराष्ट्र पोलीस अधिनियम १९५१ चे कलम १३१ अन्वये कारवाईस पात्र राहतील याची सर्व संबंधीतांनी नोंद घ्यावी.

हा आदेश माझी स्वाक्षरी व शिक्क्यानिशी आज दि.२ /१२/२०२२ रोजी काढण्यात आला आहे.

SUPERINTENDENT OF POLICE

(समीर शेख)
पोलीस अधीक्षक सातारा.

**ठिकाण** - सातारा
**दिनांक** - २ /१२/२०२२
क्रमांक :जिविशा-७/श्री सेवागीरी यात्रा/२०२२ - ८६०७

सातारा दिनांक- २ /१२/२०२२

**प्रत : माहितीसाठी व योग्य त्या प्रसिध्दीसाठी**

(१) जिल्हा प्रसिध्दी अधिकारी,सातारा.
(२) सर्व दैनिक वृत्तपत्रे संपादक व प्रतिनिधी.

**प्रत : माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी**

(१) उपविभागीय पोलीस अधिकारी,कोरेगांव विभाग
(२) सहाय्यक पोलीस निरीक्षक, पुसेगांव पोलीस ठाणे.
(३) विभाग नियंत्रक,राज्य परिवहन महामंडळ,सातारा

Scanned with CamScanner